International Journal of Advance and Applied Research
www.ijaar.co.in
ISSN – 2347-7075 Impact Factor – 7.328
Peer Reviewed Bi-Monthly
Vol.11 No.4 March – April 2024

# कुटुंब संस्थेमधील परिवर्तनाचा समाजशास्त्रीय अभ्यास

**तैय्यबा अप्पासाहेब मुलाणी.**

*संशोधक विद्यार्थी, समाजशास्त्र विभाग, शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर.*

*Corresponding Author - तैय्यबा अप्पासाहेब मुलाणी.*

**DOI - 10.5281/zenodo.10958155**

**प्रस्तावना**:

दीर्घकाळ कठीण परिस्थितीतून जाऊनही भारतीय संस्कृती टिकून राहिली. याचे कारण आपली कुटुंब व्यवस्था मनुष्य कुटुंब व्यवस्थेत श्रेष्ठ संस्कार ग्रहण करू शकतो .दीडशे वर्षाच्या पाश्चात्य सत्तेचे परिणाम म्हणून भोगवादी विचारसरणी आणि व्यवनाधिनता आपल्या समाजात वाढत आहे. अशावेळी अनेक चांगले अनुभव देऊन आधुनिक आदर्श कुटुंब संस्थेमध्ये परिवर्तन झालेला दिसतो .भारतीय संस्कृतीत कुटुंब हे खूप महत्त्वाचे स्थान आहे आणि विवाह हे एक पवित्र बंधन मानले जाते समाजात राहत असताना कुटुंब ही संस्था समाजाच्या केंद्रस्थानी असते. समाजात राहत असताना स्त्री व पुरुष यांचा विवाह होऊन, जेव्हा त्यांची अपत्य होतात. तेव्हाच कुटुंब निर्माण होते .त्या कुटुंबातूनच समाज निर्माण होतो अशा प्रकारे कुटुंब आणि विवाह यांचा फार जवळचा संबंध आहे.

'कुटुंब' म्हणजे परस्परांशी नाती असलेल्या माणसांचा समूह. माणसांमधील नाती ही जन्मावरून, विवाहावरून अथवा दत्तक घेण्यावरून निर्माण होतात. कुटुंबसंस्था एकत्र अथवा विभक्त अशी दोन्ही प्रकारची असू शकते. विभक्त कुटुंबसंस्थेत आई-वडिल, पती-पत्नी, मुलगा-मुलगी असे प्राथमिक घटक असतात. एकत्र कुटुंबपद्धतीत इतर दुय्यम नातेसंबंधांचा अंतर्भाव होतो. साधारणतःपुरुष हा कुटुंबाचा प्रमुख असतो.

**गृहीतके:**

1) समाजव्यवस्था आणि कुटुंबव्यवस्था या मध्ये महिलांचे स्थान बदलत आहे.
2) कुटुंब संस्थेमध्ये खूप मोठ्या प्रमाणात झालेले परिवर्तन आपणाला पाहायला मिळते.
3) समाजव्यवस्था आणि कुटुंबव्यवस्था ह्या मधे महिलांना मिळणारे दुय्यम वागणूक बंद झाली .

**उद्दीष्ट**

1) सामजिक संस्थाचा अभ्यास करणे.
2) कुटुंब संस्थेचा कार्याचा अभ्यास करणे.

3) कुटुंब संस्थेमध्ये झालेले परिवर्तन अभ्यासणे.

**संशोधन पद्धती:**

प्रस्तुत विषयासाठी वर्णनात्मक संशोधन पद्धतीचा वापर केलेला आहे. विविध संदर्भ ग्रंथांचा वापर केलेला आहे.

**सामजिक संस्था:**

सामाजिक संस्था म्हणजे कायदे, सर्वसामालोकरूढी, लोकनीती, कायदे, सर्वसामान्य मूल्ये, दंडक नियम, कल्पना, शिकवण आणि कार्यपद्धती या सर्वांची एकत्रित गुंफण असलेले व्यवस्था असते. उदाहरणार्थ: पारंपरिक हिंदू विवाह संस्था, अनेक लोक रुढीने नियमित केली दिसून येईल. उदाहरणार्थ साखरपुडा, मंगल अक्षता, कन्यादान इत्यादी.

'हार्टन' आणि 'हॅट' यांच्यामते, "संस्था म्हणजे सामाजिक संबंधांची संघटित अशी व्यवस्था की ज्यामध्ये काही समान मूल्य आणि वर्तन रीतींचा समावेश होतो आणि जी समाजाच्या काही मूलभूत गरजा भागवते."

**प्रमुख सामाजिक संस्था आणि संस्थांचे प्रकार:**

१) कुटुंब संस्था
२) विवाह संस्था
३) अर्थव्यवस्था
४) राज्यव्यवस्था
५) शिक्षण व्यवस्था
६) धर्म संस्था
७) मनोरंजन

या सात संस्थांपैकी कुटुंब हा समाजातील आकाराने लहान समूह आहे. हे कुटुंब ही मूलभूत आणि प्राथमिक स्वरूपाची संस्था असून, ती नवजात बालकाचे पालन पोषण आणि देखभाल करीत असते. व्यक्तीच्या सामाजीकरणासाठी देखील मदत करीत असते. कुटुंबामुळे मानवी प्रवृत्ती आणि व्यक्तिमत्त्वाची जडणघडण होत असते.

**कुटुंब:**

कुटुंब म्हणजे एकमेकांशी नाते असलेला व्यक्तीचा समूह जी नाती जन्मानंतर किंवा दत्तक घेतल्यानंतर निर्माण होतात.

**कुटुंब संस्थेचे कार्य:**

कुटुंबाची विविध कार्य आहेत त्या कार्यामुळेच कुटुंब व्यवस्था टिकून आहे. कुटुंब संस्थेत ही जैविक कार्य मानसिक कार्य ,सामाजिक कार्य, आर्थिक कार्य ही कार्य आढळून येतात.

**१) जैविक कार्य:**

स्वतःच्या कुटुंबाचे पालन पोषण करून कुटुंबात सातत्यता कायम ठेवणे हे फार महत्त्वाचे कार्य आहे. पती व पत्नी यांच्या शारीरिक संबंधातून अपत्य जन्मते व त्यातून वंश हे वाढत जाते. त्यातूनच घराचा वारस जन्माला येतो जर कुटुंबात वारस जन्मत नसेल, तर मुलेही दत्त घेणे ही प्रथा

अस्तित्वात आहे. कुटुंबातील व्यक्तींचे पालन पोषण संरक्षण करणे हे प्रमुख जैविक कार्य होय.

**२) मानसिक कार्य :**

कुटुंबातील व्यक्ती पती व पत्नी, मुले यांच्यामध्ये आपुलकी ,प्रेम ही भावना आवश्यक असते. पती-पत्नीमध्ये प्रेम असणे व बहीण व भाऊ , आई वडील, आई मुले ,वडील मुले आपुलकी प्रेम असणे गरजेचे आहे .त्या भावना जोडल्या गेल्या तर मानसिक समाधान मिळते .कुटुंबात प्रेम आपुलकी आत्मीयता सुरक्षितता इत्यादी जाणीव व्यक्ती विकासाला आवश्यक असते.

**३) सामाजिक कार्य:**

प्रत्येक व्यक्तीपासून कुटुंबाची निर्मिती होते. कुटुंबापासून समाजाची निर्मिती होते. प्रत्येक कुटुंबात सामाजिक वारसा संक्रमित होतो. सामाजिक वारसा म्हटले तर संस्कृती धर्म भाषा इत्यादींचा समावेश होतो. जेव्हा बाळ जन्माला येते त्यानंतर ते बोलू लागते, तेव्हा त्याला भाषा बोलायची शिकवली जाते. तसेच ते मुल अनुकरण करत असतात. त्यांच्याच प्रमाणे समाजात राहत असताना सर्व गोष्टी शिकणे व त्याचे अनुकरण करणे गरजेचे आहे. व ते केले जाते त्यातूनच आंतर व्यक्तीक सामाजिक कौशल्य शिकण्याला सुरुवात होते. हे शिकण्याची जागा म्हणजे कुटुंब होय.

**४) आर्थिक कार्य:**

कुटुंबाचे महत्त्वाचे कार्य म्हणजे आर्थिक बाजू घट्ट असेल, तर कुटुंबातील सर्व गरजा ह्या पूर्ण होतात. म्हणजेच अन्न, वस्त्र, शिक्षण, आवडीनिवडी, खेळ यासाठी पैसा लागतो. ते कुटुंबात असेल तरच जीवन हे सुखकर व सोयीनुसार जगता येते.

**कुटुंब संस्थेमध्ये झालेले परिवर्तन:**

भारतीय कुटुंबातही अलीकडे परिवर्तन होताना दिसत आहे. कुटुंब हे आपल्या सोयी सुविधा पाहत असताना त्यातून परिवर्तन होताना दिसत आहे. आधुनिक काळात औद्योगिक क्रांती घडून आली जगात फक्त पुरुषच नाही तर स्त्रिया ही अर्थार्जणसाठी काम करू लागल्या. त्यातून कुटुंबांचे परिवर्तन दिसू लागले.

**१) आर्थिक:**

पारंपरिक पद्धतीमध्ये कुटुंबात पुरुष हे कमवत असतो व महिला या गृहिणी म्हणून राहत असतात. त्यावेळेस महिला पुरुषावर अवलंबून राहत. आधुनिक युवकात महिलाही पुरुषाच्या बरोबरीने काम करून कुटुंबात अर्थसहाय्य करू लागल्या. त्यातून स्त्रीला आर्थिक स्वातंत्र्य प्राप्त झाले.

**2) औद्योगीकरण/ शहरीकरण:**

समाजातील आणि सामाजिक स्थान प्राप्त करून देणे, या कुटुंबाच्या दोन कार्यात समाजातील औद्योगीकरण व शहरीकरण प्रत्येक व्यक्तीस साध्य असलेली सामाजिक चलनशीलता यांच्यामुळे काही प्रमाणात मुरड बसलेली आहे. ग्रामीण भागातील कुटुंब हे शहरीकरणाकडे स्वतःच्या सोयीसुविधामुळे धाव घेऊ लागले. औद्योगीकरणामुळे सर्व कुटुंबाचे स्थलांतर होऊ लागले व त्यातूनच विभक्त कुटुंब पद्धती ही स्थलांतरामुळे निर्माण होऊ लागली.

**३) कुटुंबातील सांस्कृतिक परिवर्तन:**

जगात बहुतांश संस्कृतीतील मुले बदलत आहेत. समाजातील भाषा, नीतिमूल्ये, राहण्याच्या, खाण्याच्या, पेराव्याच्या सवयी, सामाजिक, सांस्कृतिक मूल्य बदलली आणि त्यांचा परिणाम कुटुंबावर होत आहे. स्त्री ही केवळ साडीच घालून राहत नसून ती पुरुषाप्रमाणे शर्ट पॅन्ट ही घालत आहेत. अशाप्रमाणे संस्कृतीत बदल झालेला दिसत आहे.

**४) शैक्षणिक बदल:**

शिक्षणात स्त्रीला महत्त्वाचे स्थान देण्यात येत आहे. शिक्षणामुळे स्त्री ही सक्षम होताना दिसत आहे. स्त्री शिक्षणाचा मुख्य फायदा म्हणजे तिच्या मुलांचे संगोपन हे उत्तम पद्धतीने करू लागली. योग्य अयोग्य यांचा विचार कुटुंबातही स्त्री करत आहे. शिक्षणामुळे कुटुंबाच्या गरजा व पुरुषास खांदा लावून कुटुंबाचे संरक्षण स्त्री करताना दिसत आहे. नुकतेच जन्माला आलेले मुल सुरुवातीला असहाय्य अवस्थेत असते.ज्या समाजात ते जन्मते त्याच्या संस्कृती कौशल्याचे संपादन त्यांच्यातून होते. सामाजीकरणाची सुरुवात जरी कुटुंबापासून होत असली, तरी शालेय महाविद्यालयीन आणि त्यापुढे आयुष्यातही समाजीकरणाचे सातत्याने टिकून राहते. समाजशास्त्रीय दृष्टिकोनातून समाजीकरणाच्या प्रक्रियेमध्ये शिक्षण महत्त्वाची भूमिका पार पाडते.

**निष्कर्ष:**

समाजात कुटुंब संस्थेला केंद्रबिंदू मानून, अनन्यसाधारण महत्व दिसून येते. कुटुंबातील व्यक्तींच्या आर्थिक , शैक्षणिक , सामाजिक आणि सांस्कृतिक परिवर्तन घडवून आलेला आहे. त्यामुळे स्त्रिया ह्या स्वावलंबी बनल्या आहेत. त्यातूनच स्त्री पुरुष समानता निर्माण झाली. त्यामुळे कौटुंबिक व्यवस्था सुरळीत चाललेली आहे.

**संदर्भ:**


1) Ackerman,Nathan B.The Psychodynamics of Family Life.Basic Books ,1972.
2) Hutter,Mark, The changing family comparative perspectives.2nd Ed Macmillan Publishing Company.1988.
3) Leslie,G.R. Marriage in a Changing World John Wiley,1977.
4) https:/Mr.vikaspedia.in
5) सुधा काळदाते,भारतीय समाजरचना, महाराष्ट्र विद्यापीठ ग्रंथनिर्मिती मंडळ, भारत मुद्रक आणी प्रकाशक.ली., औरंगाबाद,१९७६.